N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** पठारी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0596  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 23/10/2026 18:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 06/10/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/10/2026

**Time From (वेळेपासून):** 19:56 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 22:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 23/10/2026  **Time (वेळ):** 18:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 23/10/2026 18:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महसुल कार्टरच्या समोर पाथरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश हनमनलु मलपिलु

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,हिंगोली ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,हिंगोली ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8485070037

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अतुल अंबादास जोशी | | | 1. महसुल कार्टर पाथरी,पठारी, परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

सरकार तर्फे फिंयाद दिंनाक 23/10/2026

मी, राजेश हनमनलु मलपिलु, वय - 42 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, हिंगोली मो.नं. 8485070037
सरकार तर्फे फिंयादी होऊन फिंयाद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, जुन 2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे.
मी दिंनाक 06.10.2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक नांदेड, परिक्षेत्र नांदेड यांनी मला कळविले, एक तक्रारदार यांची एका खाजगी इसमा विरुध्द तो लोकसेवकासाठी व स्वतः साठी लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार आहे. नमुद तक्रारदार यांची त्यांचे सांगण्याप्रमाणे ते बोलावतील त्या ठिकाणी आपण पंचासह जावुन त्यांची रितसर तक्रार घेवुन लाच मागणी तक्रारीची पडताळणी व पुढील कारवाई करावी असे तोंडी आदेश दिले.
त्यावरुन आम्ही लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाईचे अनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांचे कार्यालयाचे पंच 1) श्री सुदाम जगण चव्हाण, वय 40 वर्ष पद- कनिष्ठ सहाय्यक, गट -क, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,हिंगोली रा.जिनमाता नगर,हिंगोली 2) श्री राजिव प्रकाशराव घुगे, वय 37 वर्ष पद-कनिष्ठ सहाय्यक, गट - क, कृषी विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली रा.वैष्णवी नगर, खटकाळी बायपास, हिंगोली असे ला.प्र.वि.हिंगोली कार्यालयात हजर आले.
त्यानंतर लाप्रवि कार्यालयात हजर आलेल्या पंचाना तक्रारदारा बाबत सविस्तर माहिती देवुन तक्रारदार यांची भेट घेवुन तेथे तक्रार घेवुन पुढे तक्रार पडताळणी करीता पाथरी जि.परभणी येथे जाणे असल्याचे कळविले.त्यानंतर आम्ही, लाप्रवि कार्यालयातील अंमलदार सपोउपनि/ विजय शुक्ला, पोह/रविंद्र वरणे, पोह/ गोविंद शिंदे, पोशी विनोद पुंडगे व हजर आलेले दोन्ही पंच असे पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी लागणा-या आवश्यक साहित्यासह शासकिय वाहन क्र. एम.एच.33 सि 0279 ने अंदाजे 15.30 वा. अ.सी.बी. कार्यालय, हिंगोली येथुन निघुन तक्रारदार यांच्या मोबाईलवर संपर्क करुन त्यांचे सुचने प्रमाणे औंढा ना. ते झिरो फाटा मार्गे परभणी शहरातुन 18.25 वाजता मानवत शहराच्या अलीकडे असलेल्या मानवत बायपास रोडवर पोहचलो. त्यानंतर काही वेळाने स्कुटीवर सदर ठिकाणी एक ईसम शासकिय वाहना जवळ आला. तेव्हा आम्ही त्यांचे नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव महेंद्र बालासाहेब चौरे रा.डाकु पिंप्री ता. पाथरी जि.परभणी असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना आमचा, पंचाचा व सोबतच्या स्टॉफचा परिचय करुन दिला. त्यानंतर शासकिय वाहनात तक्रारदार यांनी पंचा समक्ष तोंडी कथन केलेली तक्रार त्यांचे सांगणे प्रमाणे लिहुन घेतली ती पुढील प्रमाणे,
"मी महेंद्र बालासाहेब चौरे वय 28 वर्षे व्यवसाय शेती रा. डाकु पिंप्री ता. पाथरी जि. परभणी मो.नं. 9767342838मी आपण समक्ष विचारले वरुन सांगतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. तसेच माझ्या कडे एक दहा चाकी टिप्पर वाहन असुन वाळू विक्रीचा व्यवसाय करतो. मी दिंनाक 06.08.2026 रोजी आमचे गावातील श्री. विष्णु घुगे रा.डाकु पिंप्री यांचेकडे असलेले दहा चाकी टाटा कंपनीचे टिप्पर क्रमांक एम.एच.26 बीई 3073 असलेले त्यांचेकडुन मालकी हक्काचा व खरेदी विक्रीचा बाॅन्ड करुन खरेदी केला आहे. सदरचे टिप्पर माझे ताब्यात असून वाळु वाहतुकीसाठी वापरतो. सदर टिप्परवर माझा भाऊ महेश बालासाहेब चौरे व मी चालक म्हणुन टिप्पर चालवितो.अंदाजे चार महिण्यापुर्वी आमच्या गावा शेजारी जाणा-या गोदावरी नदी पात्रा करीता शासनाकडुन रायल्टी भरुन विष्णु घुगे यांनी वाळु खरेदी केली होती. सदर वाळु घरकुलासाठी मागणीनुसार लोकांना विक्री करण्यासाठी गावाचे परिसरात जमा केली होती. सदरची वाळु यापुर्वीच

रायल्टी भरल्या असल्याने मी आता माझ्या ताब्यात असलेल्या टिप्परने परिसरात मागणीनुसार वाळु वाहतुक करीत असतो.तहसिल कार्यालय पाथरी येथील तहसिलदार नितीन गर्जे यांचेकडे असलेली शासकिय गाडी ही चालक म्हणुन पाथरी शहरातील अतुल जोशी हा खाजगी इसम चालवितो व तहसीलदार साहेबांचे वाळु हप्ता म्हणुन पैसे तो जमा करत असतो. दिनाक 05.10.2026 रोजी पाथरी शहरात तहसिल परिसरात खाजगी इसम अतुल जोशी तहसिल वाहनाचा चालक भेटला व त्याने मला तुमच्याकडे टिप्पर असुन तु टिप्परने वाळु वाहतुक करीत असतो. त्या टिप्परवर तहसिलदार साहेबांची व आमची कारवाई नको पाहिजे असेल तर एक महिण्यासाठी 50,000/- रुपये हप्ता द्यावा लागेल असे म्हणुन माझेकडे 50,000/- रुपये पैश्याची मागणी केली आहे.अतुल जोशी मागत असलेली पैसे हे कोणत्याही नियमानुसार नाही. ती लाच आहे. याची मला खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांनी मला आज रोजी भेटायला बोलाविले आहे. त्यांना भेटल्यावर ते मला किंवा त्यांचे 16 ptमार्फत इतर कोणी माझ्या टिप्परवर वाळु वाहतुक करताना कारवाई न करण्यासाठी म्हणुन पैश्याची व लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी. त्यांनी मागणी केल्यास त्यांना लाच म्हणुन 50,000/- रुपये मी शेती उत्पन्नापासुन नफा मिळालेली रक्कम सोबत आणली आहे. अशी तक्रार दिली आहे.तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार लिंहल्यानतर तक्रार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तक्रार व लिहलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर शासकीय पंचा समक्ष तक्रारदार महेंद्र चौरे यांनी खाजगी इसम अतुल जोशी यांचा ठावठिकाणा घेतला असता, खाजगी इसम अतुल जोशी हे पाथरी शहरातील पाथरी ते माजलगाव रोडवरील महसुल
का ॅ
ट
र मध्ये राहत असल्याने महसुल का ॅर्टरच्या समोरील रोडवर जावून त्यांची भेट घेणार आहे व माझे कामासंबंधाने बोलणी कर
फिर्याद दिली सही

(राजेश मलपिलु) पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.,हिंगोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

LAXMAN MADHAVRAO KENDRE(I (Inspector)) / PORN82264 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपांस करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

(उर्वरित फिर्यादीचे पेज वेगळे जोडण्यात आले आहे.)करणार असल्याने पुढील कार्यवाही करावी असे तक्रारदार महेंद्र चौरे यांनी सांगीतले होते. त्यावरून लाचमागणी पडताळणी कारवाईकामी तक्रारदार यांचे सोबत पंच क्र.01 सुदाम चव्हाण यांना पाठवून लाचमागणी करण्याचे व त्यादरम्यान व्हाईस 16 pt रेकॉर्डरचा वापर करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर अंदाजे 19.56 वा. तक्रारदार श्री महेंद्र चौरे व पंच क्र.1 श्री चव्हाण यांना तक्रारदार यांचे स्कुटीने डि.जे.पी कॉलेज कॅम्पस परिसरातुन खाजगी इसम अतुल जोशी यांची भेट घेण्यासाठी पाथरी ते मालजगाव जाणारे रोडवरील महसुल कार्टरकडे रवाना केले. काही वेळाने तक्रारदार श्री महेंद्र चौरे व पंच क्र. 1 श्री चव्हाण हे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि/पुंडगे यांनी तक्रारदार श्री महेंद्र चौरे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री महेंद्र चौरे व पंच क्र.1.चव्हाण यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र.1 श्री चव्हाण यांनी सांगितले की, तक्रारदार व खाजगी इसम अतुल जोशी यांची महसुल कॉटर्र पाथरी समोरील रोडवर माझे समक्ष भेट झाली. त्यावेळी खाजगी इसम अतुल जोशी व तक्रारदार महेंद्र चौरे यांच्यात तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण खाजगी इसम अतुल जोशी यांनी तक्रारदार महेंद्र चौरे यांना त्याचे कडील टिप्पर मधुन वाळु वाहतुक करण्यासाठी तसेच टिप्परवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी चाळीस...पंचविस...पाच...एकुण सत्तर असे म्हणुन सांकेतिक भाषेमध्ये लाचेची मागणी केली आहे.खाजगी इसम अतुल जोशी यांची लाचेची मागणी स्पष्ट नसल्याने पुन्हा तक्रारदार यांना त्यांचेकडे पाठवुन खाजगी इसम अतुल जोशीयांचे स्पष्ट लाच मागणी आहे किंवा नाही यांची पडताळणी करण्यासाठी पुन्हा तक्रारदार याच्याकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन अंदाजे 20.49 वा. पंच क्र.1 श्री चव्हाण यांच्यासह तक्रारदार यांच्याकडील स्कुटीने डि.जे.पी कॉलेज कॅम्पस परिसरातुन खाजगी इसम अतुल जोशी यांची भेट घेण्यासाठी महसुल कार्टरकडे रवाना केले. काही वेळाने तक्रारदार श्री महेंद्र चौरे व पंच क्र.1 श्री चव्हाण हे पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि/पुंडगे यांनी तक्रारदार श्री महेंद्र चौरे यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री.महेंद्र चौरे व पंच क्र.1.चव्हाण यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमा बाबत विचारपुस केली. त्यावेळी पंच क्र.1 श्री चव्हाण यांनी सांगितले की, तक्रारदार व खाजगी इसम अतुल जोशी यांची तहसिल कार्यालय पाथरीच्या परिसरात असलेल्या एका आईस्क्रिमच्या दुकानाजवळ माझे समक्ष भेट झाली. त्यावेळी खाजगी इसम अतुल जोशी व तक्रारदार महेंद्र चौरे यांच्यात तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण खाजगी इसम अतुल जोशी यांनी तक्रारदार महेंद्र चौरे यांना तक्रारदार यांचे लोडर सोडुन त्याचे कडील टिप्पर मधुन.वाळु वाहतुक करण्यासाठी तसेच टिप्परवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी पंचेचाळीस हजार रुपये करा... असे म्हणुन 45,000/- रुपयाची लाचेची मागणी करून. लाच रक्कम आजच स्विकारणार आहेत असे सांगीतले. लाच मागणी पडताळणी कार्यवाही वरुन नमुद खाजगी इसम अतुल जोशी हे त्याच दिवसी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि.06.10.2026 रोजी तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे खाजगी इसम अतुल जोशी यांची महसुल कॉर्टर परिसरात भेट घेणार असल्याने, महसुल कॉर्टर परिसरात सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी सापळा पुर्व कारवाई केली. पोह श्री.शिंदे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अॅन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. खाजगी इसम अतुल जोषी यांनी तक्रारदार महेंद्र चौरे यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर तक्रारदार यांनी त्यांचे गळयातील पांढरा मोठा रूमाल हातात धरुन लाच स्विकारल्याचा ईशारा करण्यास सुचना दिली. त्यानंतर पोह/शिंदे यांनी 45,000/-रू. (ज्यात 500/-रू. दराच्या 90 नोटा) लाच रक्कमेला अॅन्थ्रॉसिन पावडर लावुन तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडे 22.03 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क्र.1 चव्हाण यांच्या सोबत खाजगी इसम अतुल जोशी यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार 16 pt चौरे यांना त्यांचे स्कुटीने महसुल कॉर्टरकडे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील सपोउपनि/शुक्ला , पोह श्री.वरणे, पोशि/विनोद पुंडगे, व पंच क्रं.2 घुगे असे शासकिय वाहन क्र.एम.एच.33 सी 0279 ने रवाना झालो. त्यानंतर पाथरी ते माजलगाव जाणारे रोडवर तक्रारदार व पंच क्रमांक 01 पोहचल्यानंतर सापळा पथकाने थोडया अंतरावर शासकिय वाहन बाजुला उभे करुन, तिथे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला.सदर ठिकाणी तक्रारदार यांनी खाजगी ईसम अतुल जोशी यांची भेट घेण्यासाठी सुरवातीला त्यांना फोन केला. तेव्हा खाजगी ईसम अतुल जोशी यांनी त्यांना महसुल कार्टरच्या समोरील रस्त्यावर येण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार हे त्यांच्या स्कुटीने रस्त्याच्या दुस-या बाजुला असलेल्या महसुल कॉर्टरकडे

गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी अतुल जोशी यांना फोन केला परंतु अतुल जोशी यांचा फोन बंद येत होता. तक्रारदार हे बराच वेळ तिथे थांबुन राहिले. तरी सुध्दा तक्रारदार व अतुल जोशी यांची भेट झाली नाही. त्यामुळे तक्रारदार हे कोणताही ईशारा न करता पंच क्र. 1 चव्हाण यांचेसह सापळा पथकाच्या शासकिय वाहनाकडे परत आले. तेव्हा तक्रारदार यांनी सांगीतल्या प्रमाणे जेव्हा खाजगी इसम अतुल जोशी हे पैसे घेण्यासाठी बोलावतील तेव्हा मी त्यांना पुन्हा भेटतो व त्यांना ठरल्या प्रमाणे लाचेची 45,000/- रुपये रक्कम देतो. तेव्हा पुढील कारवाई करावी असे सांगितले. त्यावरुन सापळा कारवाई तात्पुरती स्थगीत केली.त्यानंतर तक्रारदार यांनी आज दि.23.10.2026 रोजी जबाब दिला की, मी आज पर्यंत खाजगी ईसम अतुल जोशी यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्यासाठी भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु अतुल जोशी यांचा मोबाईल बंद येत असुन त्यांचा कोणताही संपर्क होत नाही. मी त्यांचे समोर गेलो तर ते मला जाणीव पुर्वक टाळत आहे. यावरून खाजगी ईसम अतुल जोशी यांना माझेवर संशय आला असावा, त्यामुळे ते भविष्यात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे माझ्याकडुन पैसे घेतील असे मला वाटत नाही. म्हणुन मी यापुर्वी दिलेली तक्रार व त्यावरुन दि.06.10.2026 रोजी करण्यात आलेली लाच मागणी पडताळणी व सापळा स्थगिती कारवाई वरुन अतुल जोशी, खाजगी इसम यांच्यावर पुढील कायदेशिर कारवाई करावी असा जबाब दिला आहे.तरी तक्रारदार श्री.महेंद्र बालासाहेब चौरे, वय 28 वर्षे व्यवसाय - शेती, रा. डाकु पिंप्री ता. पाथरी जि. परभणी यांनी दिनांक 06.10.2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दोन शासकिय पंचा समक्ष दि.06.10.2026 रोजी करण्यात आलेला पडताळणी कारवाई दरम्यान अतुल अंबादास जोशी, वय 42 वर्ष व्यवसाय -खाजगी वाहन चालक, सध्या परिवारासह राहते ठिकाण महसुल कॉर्टर पाथरी ता. पाथरी जि. परभणी यांनी तक्रारदार महेंद्र चौरे यांना त्यांचे वाळुचे टिपरवर कारवाई न करण्यासाठी व टिपर मधुन वाळुची वाहतुक करु देण्यासाठी पंचासमक्ष 45,000/-रू. लाचेची मागणी करून, लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केल्याचे निषन्न झाले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कलम 7 (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

(राजेश मलपिलु )
पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि., हिंगोली.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

ASI 23/10/26
पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.पाथरी जि.परभणी

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): LAXMAN MADHAVRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN82264

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):